मंगळवार, ११ जानेवारी २०२२ | वर्ष : ७ अंक : ३४६ | पृष्ठे १० | मूल्य : ४.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती

संस्थापक संपादक : बाळ ठाकरे

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

# माजी न्यायमूर्ती चपळगावकर, पुरव यांना 'जीवनगौरव पुरस्कार'

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी नागरिकांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाऊंडेशन संस्थेतर्फे देण्यात येणारा यंदाचा 'दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार' संभाजीनगर येथील माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना, तर 'समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार' अन्नपूर्णा परिवाराच्या प्रेमाताई पुरव यांना जाहीर झाला आहे.

महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळाचे (मासूम) रमेश अवस्थी, साधना ट्रस्टचे विश्वस्त विनोद शिरसाठ, पुरस्कार निवड समितीच्या सदस्या सुनिती सु.र. यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

हरियाणा राज्यातील सिरसा येथील अंशुल छत्रपती यांना 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' डोंबिवलीचे राम जगताप यांना 'विशेष पुरस्कार', संतोष शिंत्रे यांना पर्यावरणविषयक 'वाङ्मयप्रकार पुरस्कार', मुक्ता बाम यांना 'रा. श. दातार नाट्य पुरस्कार', अमरावतीचे रमेश अंधारे यांना 'ललित ग्रंथ पुरस्कार', डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांना 'ग्रंथ पुरस्कार', मुंबईचे सुरेश सावंत, नगरच्या सुनीता भोसले यांना 'कार्यकर्ता पुरस्कार', तर धाराशिवचे युवराज गटकळ यांना 'युवा पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner